| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १३० वा | बुधवार दिनांक २९ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## ‘आपला जीव धाराशिव – व्हिजन २०३०’ उपक्रमाचे उद्घाटन

# प्रत्येक योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या तर गावे समृद्ध होतील – ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

धाराशिव,दि.२७ जुलै (जिमाका) जिल्ह्यातील विविध क्षेत्रांच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प धाराशिव जिल्हा परिषदेतर्फे करण्यात आला असून, जिल्ह्याच्या विकासाचे स्पष्ट व्हिजन ठेवून काम करणारी धाराशिव जिल्हा परिषद ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद आहे.मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णयही या व्हिजनमध्ये प्रतिबिंबित होतो.शासनाच्या प्रत्येक योजना लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचल्या,तर गावे निश्चितच समृद्ध होतील,असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

जिल्हा परिषद धाराशिवच्या ‘आपला जीव – धाराशिव व्हिजन २०३०’ या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचे डिजिटल पद्धतीने उद्घाटन आज सोमवारी २७ जुलै रोजी जि.प.कन्या प्रशाला मैदान येथे झाले. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात मंत्री श्री.गोरे बोलत होते.

यावेळी मंचावर मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील,जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमती.अर्चना पाटील,आमदार विक्रम काळे,जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती. प्रियंवदा म्हाडदळकर,पोलीस अधीक्षक श्रीमती. रितू खोखर, जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा श्रीमती.उषा गायकवाड,जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम समिती सभापती सिद्धेश्वर कोरे,कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती भाऊसाहेब खरसडे, समाजकल्याण समिती सभापती विश्वास कोकणे,महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीमती पूजा शिंदे,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष ध्यक्षा अस्मिता कांबळे व नेताजी पाटील,भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी तसेच माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.गोरे म्हणाले,प्रत्येक जिल्ह्याने विकासाचा ठोस संकल्प केला,तर महाराष्ट्र अधिक वेगाने प्रगती करेल.धाराशिव जिल्हा परिषद व्हिजन ठेवून पुढे जात असून, हे व्हिजन २०३० पर्यंत पूर्ण करण्याचा निर्धार आहे.नवीन पिढीनेही या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन काम केले पाहिजे.जिल्हा परिषदेने ग्रामीण विकासाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण विषय या व्हिजनमध्ये समाविष्ट केले आहेत.त्यामुळे ग्रामीण भागाचे चित्र निश्चितच बदलेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.ते पुढे म्हणाले,उमेद अभियानाच्या माध्यमातून बचत गटांतील महिलांना सक्षम करण्यात येत आहे.राज्यातील ५० लाख महिला ‘लखपती दीदी’ झाल्या असून, एक कोटी महिलांना ‘लखपती दीदी’ बनविण्याचा शासनाचा संकल्प आहे.जिल्हा परिषदेची विद्यमान इमारत १९९० मध्ये बांधण्यात आली असून,ती आता अपुरी पडत आहे. काही विभागांना आवश्यक जागाही उपलब्ध नाही. त्यामुळे भविष्यात जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले,धाराशिव जिल्हा परिषदने विकासाचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित केले आहे.हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अधिकारी,पदाधिकारी आणि कर्मचारी यांनी एकजुटीने काम करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सर्वांची जबाबदारी वाढली असून, तन-मन-धनाने विकासासाठी कार्य करावे लागेल. या व्हिजनमुळे जिल्ह्याच्या कायापालटाची प्रक्रिया सुरू झाली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपलब्ध करून दिलेल्या निधीमुळे जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलत आहे.जिल्ह्याच्या विकासासाठी आणखी जोमाने काम करण्याची गरज आहे. नवीन जिल्हा परिषद इमारतीसाठी पीपीपी मॉडेलचा अवलंब करण्याची आवश्यकता असून, जिल्ह्यात आरोग्य शिबिरे आयोजित केली जात आहेत. रोजगारनिर्मितीच्या माध्यमातून महिलांना सक्षम केले जात असून, येत्या काळात सुमारे ३५०० महिलांना स्वावलंबी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.



आमदार विक्रम काळे म्हणाले, शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या योजना पोहोचविण्यासाठी व्हिजन डॉक्युमेंट तयार करणारी धाराशिव जिल्हा परिषद ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद आहे. जिल्हा परिषदेच्या इमारतीला ३५ वर्षे पूर्ण झाली असून,ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी नवीन इमारतीची मागणी मंजूर करावी. तसेच आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविकांना मोबाईल व इलेक्ट्रिक स्कूटर देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जिल्हा परिषदने घेतल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार म्हणाले,धाराशिव हा आकांक्षीत जिल्हा असून,पाच महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये प्रगती करून आकांक्षीत जिल्ह्यांच्या यादीतून बाहेर पडण्यासाठी नियोजनबद्ध काम सुरू आहे.दर्जेदार आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा आणि शाश्वत विकास यांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती अर्चना पाटील म्हणाल्या,सन २०३० पर्यंत धाराशिव जिल्हा परिषद विकासाच्या दृष्टीने आदर्श बनविण्याचा निर्धार करण्यात आला आहे.‘आपला जीव धाराशिव – व्हिजन २०३०’ या उपक्रमामुळे जिल्ह्याचे चित्र बदलणार असून,या उपक्रमाची सविस्तर माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी या उपक्रमासाठी आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करावे,अशी अपेक्षा व्यक्त करत काही मागण्याही त्यांनी मांडल्या.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळालेल्या रामकृष्ण माळी, प्रकाश गोडसे आणि नरहरी भागेकर यांना आधार प्रमाणीकरण प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.तसेच नीट परीक्षेत यश संपादन करणारा जि.प.कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी प्रतीक पाटील याचा ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीताने झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.जिल्हा परिषद अध्यक्षा.श्रीमती अर्चना पाटील यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा आई तुळजाभवानी देवीची प्रतिमा देऊन सत्कार केला.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे सर्व सदस्य,पंचायत समित्यांचे सभापती,उपसभापती,सदस्य, आशा वर्कर,अंगणवाडी सेविका, बचत गटांतील महिला,पंचायत समितीचे अधिकारी-कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप सेंगुलवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अनंत कुंभार तसेच विविध विभागप्रमुखांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे आणि ऐश्वर्या हिवारे यांनी केले,तर आभार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा म्हाडदळकर यांनी मानले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अवैध जनावरांची वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल



धाराशिव (प्रतिनिधी)- दि.२७.०७.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यात मालाविरुध्दचे गुन्हे उघडकीस आणणे व अवैध धंद्यावर कारवाई करणे कामी पेट्रोलिंग करीत असताना आळणी चौक येथे आले असता पथकास माहिती मिळाली की, अशोक लिलॅड टेंम्पो वाहन क्र एमएच २५ एजे ६५८६ व पिकअप वाहन क्र एमएच २५ पी ४२५९ या मध्ये जर्सा गायी असे प्राणी कत्तल करण्याकरीता येडशी कडून धाराशिव कडे घेवून जाणार आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आळणी चौक येथे १३.३० वा. चे सुमारास रोडवरुन अशोक लिलॅड टेंम्पो व पिकअप येत असताना दिसल्याने त्यांना बातमी प्रमाणे सदरच्यावाहनांचा संशय आल्याने त्यास हात दाखवून थांबवून नमुद चालकास त्यांना त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे दशरथ शंकर जगदाळे, वय ५२ वर्षे, रा. हिवरा ता. भुम जि. धाराशिव, बालाजी भिकाजी सोनवणे, वय ३८ वर्षे, रा. भोनगिरी ता. भुम जि. धाराशिव असे असल्याचे सागिंतले वरुन पोलीस पथकाने वाहनाच्या पाठीमागे जावून पाहणी केली असता सदर अशोक लिलॅड टेम्पो व पिकअप वाहनामध्ये अंदाजे ३,०५,००० किंमतीचे ८ गायी दोन वासरे बांधून त्यांना पुरेसी हालचाल करता येणार नाही अशा रितीने छळ करुन त्यांची वाहतुक करीत असताना मिळून आल्याने त्याचे ताब्यातुन अंदाजे ३,०५,००० किंमतीचे गायी दोन वासरे वाहनासह असा एकुण १८,०५,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी नामे ११) दशरथ शंकर जगदाळे, वय ५२ वर्षे, रा. हिवरा ता. भुम जि. धाराशिव, २) बालाजी भिकाजी सोनवणे, वय ३८ वर्षे, रा. भोनगिरी ता. भुम जि. धाराशिव यांचे विरुध्द धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणेत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक, श्रीमती रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री विनोद इज्जपवार, सफौ अश्विन जाधव, पोलीस हवालदार समाधान वाघमारे, मपोहा शोभा बांगर, पोलीस नाईक अशोक ढगारे, चालक पोलीस अंमलदार प्रकाश बोईनवाड, केदार शेरखाने पोलीस मुख्यालय येथील टढढ पथकाचे अंमलदार यांचे पथकांनी केली आहे.

# ई-पीक पाहणीचा घोळ; सरकारच्या हलगर्जी-पणामुळे शेतकरी संतप्त, आंदोलनाचा इशारा!

कळंब, (प्रतिनिधी) : खरीप हंगाम अखेरच्या टप्प्यात आला असतानाही शासनाकडून तांत्रिक अडचणींचे कारण पुढे करत ई-पीक पाहणी सुरूच करण्यात आलेली नाही. त्यामुळे हजारो शेतकरी शासकीय योजनांपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त करत असून, सरकारच्या ढिसाळ कारभाराविरोधात संतापाची लाट उसळली आहे. ई-पीक पाहणी तात्काळ सुरू करून पूर्ण करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते ड. मनोज चोंदे यांनी दिला आहे.

यंदाच्या हंगामात सुरुवातीपासूनच अल्प पाऊस, त्यात बोगस बियाण्यांमुळे अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले. या संकटातून मार्ग काढत शेतकऱ्यांनी कष्टाने उडीद, मूग आणि सोयाबीनची पिके उभी केली. आता उडीद-मूग काढणीच्या उंबरठ्यावर असून सोयाबीनही महिनाभरात तयार होणार आहे. मात्र, अद्यापही ई-पीक पाहणी सुरू नसल्याने शेतकरी संभ्रमात पडले आहेत.

ई-पीक पाहणीशिवाय पीक विमा मिळणार नाही, अतिवृष्टी किंवा परतीच्या पावसामुळे नुकसान झाल्यास भरपाई मिळणार नाही, पीक कर्ज मिळणार नाही, तसेच सातबाऱ्यावर पिकाची नोंद नसल्यास शासकीय हमीभाव केंद्रावर सोयाबीन, उडीद व मूग विकताही येणार नाही. त्यामुळे शासनाने स्वतःच बंधनकारक केलेली प्रक्रिया वेळेत न राबवणे हा शेतकऱ्यांवर अन्याय असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांमध्ये आता संतप्त चर्चा सुरू असून, शेतकऱ्यांना शासकीय मदतीपासून वंचित ठेवून नगदी पिके कवडीमोल भावात विकण्यास भाग पाडण्याचा हा डाव आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. सातबाऱ्यावर पिकाची नोंद नसल्यास पीक कर्जही मिळत नाही, मग शेतकऱ्यांना कर्जापासूनही वंचित ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे का, असा रोष व्यक्त केला जात आहे.

ड. मनोज चोंदे यांनी शासनाला इशारा देत सांगितले की, ई-पीक पाहणी तात्काळ सुरू करून पूर्ण करावी. अन्यथा शेतकऱ्यांच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन उभारले जाईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील.

शासनाच्या या दिरंगाईमुळे कळंब तालुक्यासह परिसरातील शेतकरी संतप्त झाले असून, ई-पीक पाहणी त्वरित सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे.

# शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी व्हावे ; ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

धाराशिव दि.२८ जुलै (जिमाका) खरीप हंगामात नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे पिकांचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाने केले आहे.खरीप २०२६ हंगामासाठी कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत पीक विमा अर्ज सादर करावेत,असेही स्पष्ट करण्यात आले आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत www.pmfby.gov.in या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी सुरू असून,योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी (Agristack Farmer ID) असणे तसेच ई-पीक पाहणीमध्ये विहित कालावधीत पिकांची नोंद केलेली असणे आवश्यक आहे.

खरीप २०२६ हंगामासाठी पीक विमा अर्ज भरताना मार्गदर्शक सूचनांनुसार कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) मार्फत अर्ज करताना कोणतेही स्वतंत्र पीक कर्ज घेतलेले नसल्याबाबत स्वयंघोषणापत्र/ हमीपत्र देण्याची आवश्यकता नाही.या अटीबाबत काही प्रमाणात शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.त्यामुळे अनेक शेतकरी अर्ज करण्यास उदासीन असल्याचे निदर्शनास आले होते.

हा संभ्रम दूर करण्यासाठी कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी केंद्र शासनाकडे पत्र पाठवून संबंधित हमीपत्राची अट वगळण्याची विनंती केली आहे.तसेच जिल्हास्तरावरही ही अट रद्द करण्यासाठी कृषी आयुक्तालयाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे. यावर्षी राज्यासह धाराशिव जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असून अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नाही.हवामान विभागाने पुढील कालावधीतही सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.या पार्श्वभूमीवर खरीप हंगामातील पिकांच्या वाढीवर व उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने शेतकऱ्यांनी पीक विमा संरक्षण घेणे अत्यंत गरजेचे असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे.

नैसर्गिक आपत्ती,अतिवृष्टी, दुष्काळ,अवकाळी पाऊस,कीड व रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून आर्थिक दिलासा मिळण्यासाठी प्रत्येक पात्र शेतकऱ्याने प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता ३१ जुलै २०२६ पूर्वी पीक विमा अर्ज भरून योजनेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

## क्राईम न्युज

### मॉडेम व इनव्हटर ला कनेक्ट असलेले ३००० मिटर स्ट्रींग कॉपरची चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दि.२६.०७.२१०२६ रोजी अणदुर शिवार स्टर्लिंग अँड व्हिल्सन प्रायव्हेट लिमीटेड सौरउर्जा कंपनी येथील सोलार मॉडेम ते एम.एस. बी व इनव्हटर ला कनेक्ट असलेले ३००० मिटर स्ट्रींग कॉपर केबल अंदाजे ९०,००० किंमतीची राहुल शैलेश शिंदे, वय २२ वर्षे, रा. निलेगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव व इतर पाच इसम यांनी चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अंकुश मल्हारी लोखंडे, वय ६० वर्षे, व्यवसाय सेक्युरीटी सुपरवायझर रा. महात्मा फुले कॉलनी जळकोट ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२७.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वायरची चोरी: गुन्हा दाखल

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, दि. २३.०७.२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज(जुने) बसस्थानक तुळजरापूर येथील बोअरवेल मधील ५४० फुट थ्री फिस वायर अंदाजे २५,००० किंमतीची राहुल छगन क्षिरसागर, वय ३२ वर्षे,आब्बास शम्मु नदाफ, वय २८ वर्षे, रा.तुळजापूर, रोहन संदीप क्षीरसागर, वय २१ वर्षे, रा. गौडगाव ता. बार्शी यांनी चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-अमोल भास्कर लोमटे, वय ४७ वर्षे,सलगरा दिवटी ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२७.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### होंडा अॅक्टीव्हाची चोरी

मुरुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बालाजी शंकर भुजबळ, वय ४७ वर्षे, रा. दाळींब ता. तुळजापूर जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची होंडा अॅक्टीव्हा ही दि. १९.०७.२०२६ रोजी व्यंकट साधु टेकाळे यांचे शेतातील गोडावून समोरुन दाळींब शिवार येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली आहे. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बालाजी भुजबळ यांनी दि.२७.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### वाकवड येथून मोटरसायकल चोरली

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सागर बंकट शेळके रा. वाकवड ता. भुम यांची अंदाजे २०,००० किंमतीची मोटरसायकल क ही दि.०९.०७.२०२६ रोजी दिपक माने यांचे घरासमोरुन वाकवड येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## दुसऱ्याच्या खांद्यावर बंदुक का?

दिल्लीतील आंदोलनानंतर कॉकरोच जनता पार्टी ही काही एका रात्रीतून उभा राहीली नाही. त्याचे अनेक फॉलोअर्स निर्माण केले गेले. पाकिस्तान, बांगला देशी बरोबर इतर देशात त्याने जाळे विणले. सर्वाधिक फॉलोअर्स निर्माण करण्यामागे मोठा हेतू होता. जे भारत देशात विरोधक आहेत ते त्यांचे चहाते आहेत अशी उघड टिका केली जात आहे. यात किती तथ्य आहे हे अनेकांनी आजमावले आहे. भारताची होणारी प्रगती, त्याच प्रमाणे देशात काँग्रेसच्या काळात दंगे, बॉम्बस्फोट, घुसखोरी आदि देशविरोधी कामे होत होती त्याला आळा बसला आहे. पुर्वी मोठ्या प्रमाणात देशात वाईट घटना घडत होत्या त्याला आळा बसला, हे तरी देशातील जनता मान्य करावे लागेल. राहीला दुसरा प्रश्न या देशात बारावर्षापासून मोदी पंतप्रधान म्हणून मजबुत स्थितीत देश सांभाळत आहेत. काँग्रेस पेक्षा भाजपा बरा का म्हटले जाते याचा विचार केला पाहिजे. काँग्रेस पक्ष देश स्वतंत्र होण्याचा पुर्वीचा असला तरी त्याची पकड ढिली झाली व अनेक राज्य काँग्रेसमुक्त होत गेली. एकतर भाजपा तसेच दुसऱ्या प्रादेशिक पक्षाची सत्ता आली. काँग्रेसला राज्य का जिंकता आले नाहीत याचा विचार खोलवर केला जात नाही. स्वत:ला येत असलेले अपयश पाहाता इतर पक्षाची हातमिळवणी केली खरी त्याही पक्षाला जनता स्विकारण्यास तयार नाही. त्यामुळे आता आयते चालुन कॉकरोच जनता पक्ष आला. त्याने युवकांना आपल्याशी केले व पहिले यश केंद्रिय शिक्षण मंत्र्याचा राजीनामा घेण्यात आला. कोणतीही क्रांती यशस्वी करण्यासाठी युवकांचा सहभाग महत्वाचा असतो. भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी युवकांचा सहभाग मोठा होता, हे मान्य केले पाहिजे. इतर देशाचा इतिहास पाहिला तर लक्षात येते, युवकामुळे अनेक तख्त उखडून काढले. त्याच प्रमाणे बांगला देश व नेपाळ मध्ये जी क्रांती घडवुन सत्ताधाऱ्यांना पळवुन लावले, उद्रेक घडविला, हिंसा घडविली ती युवकांनी हे तसे सांगण्याची गरज नाही. हा घडलेला इतिहास, माहिती आहे. त्यामुळे देशात जे दिल्लीत घडले किंवा घडविले यावर चिंतन प्रत्येक भारतीयांनी केले पाहिजे. देशात विद्यार्थी संघटन आहे. विविध धर्माचे, पक्षाचे नेते आहेत, असे असताना दिपके यांनी परदेशातून येवून जे काम केले ते सर्वांनी पाहिले आहे. एक नियोजनबद्ध आखणी करून ते यशस्वी झाले व सत्ताधाऱ्यांना त्यांना रोखू शकले नाहीत. आंदोलन योग्य का अयोग्य होते यात न जाणे योग्य! मात्र आंदोलनास सर्व जे देशातील विरोधीपक्ष सोबत होता त्यांनी पाठींबा दिला. या आंदोलनकर्त्यांनी मागितला नाही मात्र पाठींबा दिला. आजही काँग्रेस या आंदोलनकर्त्याच्या पाठीशी आहे. त्यांची वकील करण्यात पुढे आला आहे. वास्तविक जे काँग्रेसला पंच्याहत्तर वर्षाचा असलेला अनुभव कामी आला नाही तो दिपके यांनी करून दाखविला. ते दाखविताना ते परदेशातून मिळणाऱ्या फंड, सहकार्य किंवा सर्वप्रकारची मदतीवर शक्य झाले का हा संशोधनाचा विषय आहे. भारतीय नागरिक परदेशात राहुन भारतात येवून आपली चुणूक दाखवित आहेत या बाबीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. वास्तविक काँग्रेस हा पक्ष देशातील प्रमुख असा विरोधीपक्ष आहे. याला सर्वजन जाणतात. असे असले तरी प्रत्यक्षात काँग्रेस सध्याला कॉकरोच जनता पक्षाच्या खांद्यावर बंदुक ठेवून जी वाटचाल करीत आहे हे ओळखले पाहिजे. मंत्र्याचा राजीनामा घेणे किंवा मंत्र्यांनी देणे ही बाब महत्वाची नाही. पेपरफुटी प्रकरणी जे घडले ते पुन्हा घडू नये. विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये हे महत्वाचे आहे. तसे पाहिले तर बारा वर्षात काँग्रेसने काही ही केले नाही ते भाजपाने करून दाखविले. काँग्रेस भाजपापेक्षा चांगले करू शकली असती. तसे पाहिले तर काँग्रेस राममंदिराचा प्रश्न सोडवु शकली असती. जम्मूकाश्मीरातून ३७०कलम हाटवू शकली असती. अतिरेक्यांना रोखू शकली असती. जगात भारताची शान व मान उंचवू शकली असती. ते काँग्रेसने केले नाही म्हणून देशातील जनता भाजपाकडे वळली. याला जबाबदार तसे पाहिले तर काँग्रेस आहे. काँग्रेसने देशहीत पाहुन पावले उचलली असते तर आज दैना झाली नसती किंवा कॉकरोच पक्षाला सोबत जाण्याची गरज भासली नसती. आजही शंभरटक्के जनता देशात घडलेल्या परिस्थितीशी सहमत नाही. असेल वीस-तीस टक्के असतील. ही घटना घडली यामागे दिर्घ नियोजन असले पाहिजे. परेदशीयांचा भक्कम पाठींबा असला पाहिजे. मोठ्या प्रमाणता फंडींग सुद्धा मिळालेली असेल. देशात सर्वात दुर्दैवी बाब म्हणजे जो पैसा परदेशातून येतो यावर सरकारचे नियंत्रण नाही. येणारा पैसा हा कशासाठी, कोणत्या कामासाठी वापरला जातो या बद्दलची माहिती नाही. देशात जो नवीन कायदा निर्माण करीत याला विरोध पहिल्यांदा अमेरिकेतून होत व होणार आहे. भारतात मदर टेरीसाच्या मशिनरीज जे काम करतात ते आदिवासी व भारताच्या दुर्लक्षित, डोंगराळ भागाकडे आहे. मग धर्मांतर म्हणा किंवा अन्यबाबी देशातील जनतेला माहिती आहेत. परदेशातून जी मोठ्या प्रमाणता आर्थिक मदत मिळते ते धर्मांतरासाठी वापरली जाते. देशविरोधी कामासाठीही वापरली जात असेल. देशात अलिकडील काळात परदेशिय मदतीवर देशविरोधी काम चालु आहे त्याला कायद्यानुसार चाप किंवा ब्रेक लावण्याचे काम चालु आहे. यासाठी ही काही व्यक्तीचा उपयोग होत असेल. त्यासाठी देशातील जनतेनी जागृत राहीले पाहीजे. देशात जे घडत आहे किंवा घडविले जात आहे याची देशवाशीयांनी जागे राहुन माहिती घेतली पाहिजे. देशविरोधी मोठे षडयंत्र असू शकते. आज केवळ बारा वर्षात पहिल्यांदा केंद्रिय मंत्र्याचा राजीनामा द्यावा लागला. दबाव गट निर्माण करून जे देशात घडले हे लपुन राहीले नाही. टीव्हीच्या माध्यमातून, सोशल मिडीयाद्वारे थेट प्रक्षेपन पाहीले आहे. अनेकांची मते जाणून घेतले गेली आहेत. राजीनाम देणे, योग्य का अयोग्य किंवा कॉक्रोजच पक्षाची भुमिका योग्य का चुकीची हे इतर कोणालाही सध्याला सांगण्याची गरज नाही. एवढे मात्र ज्या पक्षाला बारावर्षापासून अपयश मिळत आहे तो मात्र दिपकेंच्या खांद्यावर बंदुक ठेवून वाटचाल करीत आहे हे दिसून येत आहे. एकट्या भाजपा विरोधात सर्वच विरोधी गट, पक्ष कॉक्रोज पक्षाच्या पाठीशी उभा आहे. हे लक्षात घेता देशातील जनतेनी वेळीच सावध होणे अपेक्षित आहे. नसता पुन्हा पारतंत्र्याकडे वाटचाल होवू शकते. त्यामुळे विरोधकांनी आपली ताकद वाढविण्यापेक्षा, जनतेसोबत न राहाता उचलेले पावुल कसे आहे याचा विचार केला पाहिजे. दिल्ली आंदोलनात हत्येपासून दरोड्यापर्यंतचे २८७३ आरोपी जंतर मंतरवरील आंदोलनात सहभागी झाले होते असे एआय स्कॅनमुळे ओळख पटली असेल तर यापेक्षा भयाण दुसरे काय असणार?

# गुरुपौर्णिमा.. भारतीय संस्कृती ठेवा




गुरुपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील ज्ञान, संस्कार आणि कृतज्ञतेचा एक सुंदर पवित्र उत्सवच असतो.भारतीय संस्कृती ही अनेक सुंदर रीती, परंपरा, त्यांना अनुसरून खास उत्सव, सणवार, खाद्यसंस्कृती,वैविध्यपूर्ण यांनी अत्यंत समृद्ध अशी असल्यामुळे केवळ भारतीयच नाहीत तर परदेशातसुद्धा ही आत्मसात करून साजरी केली जाते. त्यातीलच एक गौरवास्पद परंपरा म्हणजे ही गुरुपौर्णिमा!

आषाढ शुद्ध पौर्णिमेला म्हणजे या तिथीला आपण गुरुपौर्णिमा,व्यास पौर्णिमा म्हणून गौरवितो.महर्षी व्यास मुनींना 'आद्यगुरू' मानून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे पूजन केले जाते. कारण महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असे रामायण, महाभारत यां सारखे अनेक सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिले.अशा महान ग्रंथांचे संकलन करून त्यांनी भारतीय संस्कृतीला अमूल्य ज्ञानसंपदा दिली. म्हणूनच त्यांचे हे ऋण मानून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा महान दिवस!

भारतीय संस्कृतीत गुरुचे स्थानदेवापेक्षाही श्रेष्ठ मानले गेले आहे. म्हणूनच सर्वांत आधी गुरूंना वंदन करतात,त्यांच्यात साक्षात ब्रह्मा,विष्णू, महेश यांचे दर्शन घडते. आणि मग नकळतपणे तोंडातून

**गुरु ब्रह्मा गुरु विष्णु गुरु देवो महेश्वरः**
**गुरुर्साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः हा श्लोक येतो.**

आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली ती जतन करून पुढे नेणे हे आपले कर्तव्य आहे. कारण गुरु शिवाय विद्या मिळत नाही. विद्येविना धन,सुख,मोक्ष प्राप्ती कशी मिळेल?

आपण कोणाचे तरी शिष्य आहोत, या भावनेत एक कृतज्ञता वाटते. भारतीय गुरुपरंपरेत गुरु-शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. जनक-याज्ञवल्क्य, शुक्राचार्य-जनक, कृष्ण, सुदामा-सांदिपनी, विश्वामित्र-राम,लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन अशी गुरु-शिष्य परंपरा आहे. मात्र एकलव्याची गुरुनिष्ठा पाहिली की, सर्वांचेच मस्तक नम्र झाल्याशिवाय राहत नाही. गुरु या शब्दाचा खरा अर्थ ठाऊक नसेल, तर जप, तप, व्रत, तीर्थाटन, योग आणि त्याग हे सर्व व्यर्थ आहे.गुरूजवळ शिष्याने नम्र झाल्याविना त्याला ज्ञान प्राप्त होत नसते. -अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाच्या, प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जातात ते!सद्गुरु नावाड्याचे काम करतात. आपली जीवनरूपी नौका योग्य दिशेला घेऊन जातात. कुबेराचा अक्षय्य खजिनाच आहे आणि त्या खजिन्याचे मोल होऊच शकत नाही.

म्हणजे केवळ शाळेतील शिक्षक नव्हे, तर अज्ञानाचा अंधकार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारी प्रत्येक व्यक्ती. आई-वडील, शिक्षक, संत, मार्गदर्शक, समाजातील ज्येष्ठ व्यक्ती आणि जीवनातील अनुभवसुद्धा आपले गुरु असतात. गुरु आपल्याला केवळ शिक्षण देत नाहीत, तर जीवनातील योग्य-अयोग्याची जाणीव करून देतात, आत्मविश्वास वाढवतात आणि संकटांवर मात करण्याची प्रेरणा देतात.

गुरू म्हणजे एक प्रसाद आहे. ज्याच्या भाग्यात असेल त्याला कांहीच मागण्याची इच्छा उरत नाही.गुरु म्हणजे सूर्यापेक्षाही तेजस्वी तेज आणि चंद्रापेक्षाही शीतल छाया देणारा आधार.तो एक चिंतामणी, परिस,अमृत यांच्यापेक्षाही श्रेष्ठ असतो. म्हणूनच मनुष्य जन्मात प्रत्येकाने गुरु करावाच. अगदी भगवंतांनी सुद्धा मनुष्यरूपात असताना गुरु केलेच होते. ज्ञानेश्वर माऊलींनी सुद्धा निवृत्ती नाथाना, श्रीकृष्णांनी सांदीपनी ऋषींना गुरू मानले होते. संत नामदेवांनी विसोबा खेचरांना गुरु मानले होते.

आपल्या जीवनात गुरुंना जेवढे महत्त्व आहे तेवढेच किंबहुना त्यापेक्षा जास्त महत्त्व सदगुरुंना आहे. सर्व मानवजातीला पारमार्थिक, आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणारे, भक्ताला, साधकाला मोक्षाप्रत नेणारे सदगुरु!दत्तगुरू हे या परमार्थातील एक सर्वश्रेष्ठ सद्गुरू मानले जातात.

'गुरुबिन कौन बतायें 'बाँट ।' हा मायारूपी भवसागर तरून जायचे असेल तर सदगुरुंची आवश्यकता आहे. सदगुरुच आपल्याला मोक्षाप्रत नेतात. तसेच त्यांची त्यात सत्ता पण असते. सदगुरुच सर्व काही करवून घेत असल्यामुळे नामधारकाच्या 'मी' ला कुठेही वाव नसतो. सदगुरुंकडून अनुग्रह घेतला की दुसऱ्या कोणत्याही संतांकडून अनुग्रह घेऊ नये अशी संकल्पना आहे. त्यांच्याशी एकनिष्ठेने राहावे. आज्ञा पालन करावे. एक गुरु, एक नाम असावे.मनात कोणताही किंतू न ठेवता,विकल्प येऊ न देता त्यांनी सांगितलेली साधनाअगदी मनोभावे नित्यनियमाने करावी. सदगुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे खरे गुरुपूजन !दिवशी शिष्य भक्तीभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

माझ्या मते सदृश्य आणि अदृश्य, मूर्त..अमूर्त, अशा स्वरूपात प्रत्येकाला गुरु भेटत असतात.दृश्य किंवा मूर्त गुरूंना आपण डोळ्यांनी पाहू शकतो,पायांना स्पर्श करून आशीर्वाद घेऊ शकतो. पण काही गुरु हे अदृश्य स्वरूपात सुद्धा आपल्याला पदोपदी भेटत असतात. त्यातला मोठा आणि मुख्य गुरु म्हणजे अनुभव! गुरु आपल्याला शिकवतो, ज्ञान देतो तसे हा अनुभवरुपी अदृश्य गुरुसुद्धा आपल्याला चांगले ,वाईट प्रसंगातून कायम धडे देऊन तावून सुलाखून प्रसंगी छोट्या चाचण्या,मोठ्या परीक्षा घेऊन शहाणे आणि खंबीर बनवतो. कोणत्याही संकटाला नं घाबरता त्याच्याशी दोन हात करून धैर्याने पुढचा मार्ग दाखवणाऱ्या वाटाड्याचेही काम करत असतो. जबाबदारी ओळखून चांगले, वाईट यांची ओळख करून देतो.

त्यापेक्षाही मोठा दुसरा गुरु म्हणजे आपले स्वतःचे मन! हेच नं भरकटू देता ,वाईट विचार बाहेर काढून ते शांत करण्याचे सामर्थ्य अनुभव याच गुरुत आहे. फक्त ते आपल्याला ओळखू यायला पाहिजे आणि जे धडे मिळाले त्यांचा अभ्यास..विचार करून मन ताब्यात ठेवता आले पाहिजे. अनुभव रुपी गुरुंकडून जे चांगले विचार मिळतात ते आचरणात आणून वागणारे शिष्य हेच आदर्श शिष्य असतात. सुख, दु:ख हे सुद्धा आपले गुरूच असतात. दोघेही आपली परीक्षाच घेत असतात. अती सुखात सुद्धा आपण हुरळून जाता कामा नये आणि संकटात सुद्धा डगमगू नये .हे ज्याला समजले,उमजले आणि आचरणात आणणे जमले तो उत्तम शिष्य! जे आपल्याजवळ नाही त्याची खंत नं करता आपल्याकडे काय आणि किती चांगले आहे हे ज्याला दिसते, जाणवते तो डोळस श्रेष्ठ शिष्य!सतत कार्यरत राहून दुसऱ्यांच्या कामी येणे, स्वार्थ आणि मोह टाळण्याचा पराकाष्ठेने प्रयत्न करून त्यात यश मिळवतो तो खरा आदर्श शिष्य असतो.

गुरूंकडून प्राप्त झालेल्या विद्येचा उत्तम अभ्यास करून तो व्यवस्थित सदुपयोग करतो,स्वतः बरोबरच समाजासाठी लोकांच्या हीतासाठी वापर करतो तोच आदर्श शिष्य असतो.द्रोणाचार्य हे अर्जुनाचेही गुरु होते आणि दुर्योधनाचे सुद्धा! दोघांनाही त्यांनी सारखेच शिक्षण दिले होते, पण अर्जुनाने त्या विद्येचा योग्य पद्धतीने आणि धर्माच्या,सत्याच्या बाजूने वापर केलात्यामुळे तो सर्वश्रेष्ठ धनुर्धर म्हणून कीर्तिवंत झाला.तिच गोष्ट कर्णाच्या बाबतीत पण घडली. तो सुद्धा खरंतर विद्या शक्ती,बुद्धी सर्व बाबतीत अर्जुनापेक्षाही सरस होता. त्याला हरवणे अर्जुनालाच काय,कोणालाही शक्यच नव्हते. पण केवळ त्याने मैत्रीसाठी म्हणून दुर्योधनाची म्हणजेच अधर्माची साथ दिली ही त्याची एक चूक त्याला रसातळाला घेऊन गेली.

अजून एक महत्वाची कसोटी शिष्यासाठी असते ती म्हणजे एकाग्रता, मन स्थिर करून, योग्य मार्गाने आपले लक्ष्य ,ध्येय साध्य करणे. त्यासाठी खूप परिश्रम,ध्यास असावा लागतो.याही बाबतीत एकलव्याचे उदाहरणच घेऊया. त्याने मूर्त रुपातील गुरु कडुन विद्या न घेता अमूर्त अशा गुरु कडुन प्राप्त केली होती. द्रोणाचार्यांनी त्याला शिकववण्यास नकार दिला पण त्याने मनाने आधीच त्यांना गुरुचे स्थान दिले होते.त्यामुळे त्याने गुरु द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा बनवून त्यांच्यासमोर अतिशय परिश्रम करून धनुर्विद्येत स्वतःला इतके पारंगत केले की खुद्द द्रोणाचार्य सुद्धा आवाक झाले. अर्जुन त्यांचा सर्वांत लाडका विद्यार्थी होता. त्यामुळे त्याच्यापेक्षा एकलव्य सरस ठरेल की काय असे त्यांना वाटले तेंव्हा त्यांनी ज्या हाताच्या अंगठ्यावरच धनुर्विद्या वापरली जाते तो अंगठाच गुरुदक्षिणा म्हणून त्याला मागितला आणि एक क्षणभर सुद्धा विचार नं करता त्याने तो गुरुचरणी कापून अर्पण पण केला. ही खरी थोर त्यागाची गुरुदक्षिणा!गुरूंची आज्ञा प्रमाण मानून त्यांच्याबद्दल मनात कोणताही किंतु,परंतु नं आणता पालन करणे हा खरा शिष्यधर्म होय! अगदी हेच एकलव्याने सुद्धा जाणले होते.


आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानामुळे माहिती सहज उपलब्ध होते; परंतु योग्य ज्ञान, विवेक, मूल्ये आणि जीवनदृष्टी देण्याचे कार्य गुरुच करतात.

आपल्यासारख्या सामान्य लोकांना गुरूंचे हे अशी गुरुदक्षिणा मागणे चुकीचे वाटू शकते कारण एक म्हणजे त्यांनी प्रत्यक्ष शिक्षण दिले नव्हते. एकलव्याने स्वतः मनाने परिश्रमाने ही विद्या प्राप्त केली होती तरीही त्याच्याकडून अंगठा मागणे म्हणजे त्याने कमावलेली सारी विद्याच काढून घेतली होती. हे खूप चुकीचे वाटते. पण तरीही त्याने का दिलाअसावा आपला अंगठा? विचार केल्यावर दुसरी बाजूही लक्षात येते ती म्हणजे हे महायुद्ध घडणार याची गुरूंना नक्कीच कल्पना असणार. मग अशावेळी त्यात अर्जुन म्हणजे धर्म, सत्य,न्याय यांच्या विचार करून योग्य मार्गाने चालणारा असल्यामुळे आणि महायुद्धात त्याने जिंकून राज्य योग्य हातात जाणे सामाजिक दृष्टीने जास्त महत्वाचे होते. असा दूरदर्शीपणा गुरुठायी असायला पाहीजे.तोच आदर्श गुरु असतो. आणि गुरु जे करतात ते योग्यच अशी खात्री एकलव्याला सुद्धा होती म्हणूनच त्याने ती आज्ञा मानली. यात गुरु आणि शिष्य दोघेही तोडीस तोड होते. म्हणूनच या गुरुशिष्याची आदर्श जोडी युगानुयुगे पुजली जाते. गुरु सुद्धा हुशार,चाणाक्ष, दूरदर्शी तर असलाच पाहीजे पण त्यांचा सर्वांत महत्वाचा कस म्हणजे जे जे त्यांच्याठायी ज्ञान आहे ते संपूर्ण शिष्याला देणे ,घडवणे. एखादा स्वतः खूप डिग्री, मेडल्स घेतलेला, अनेक विद्या आत्मसात असलेला असेल पण त्याने ते फक्त स्वतः साठीच वापरले, ते कोणालाही दिले नाही तर त्याचा काय उपयोग? असलेल्या विद्येचा, ज्ञानाचा योग्य वापर करणेसुद्धा तितकेच महत्वाचे असते. सर्व ज्ञान योग्य पद्धतीने देऊन समर्थ ,आदर्श शिष्य जो घडवतो तोच खरा महान गुरु असतो. म्हणजेच गुरूने आपल्याठायी असलेली सर्व विद्या शिष्याला देणे आणि शिष्यानेही ती सर्व प्रयत्नपूर्वक आत्मसात करून घेण्याची आणि त्याचा सदुपयोग करणे ही दोघांचीही जबाबदारी असते. हे जाणून जे कर्म ,वर्तन करतात तेच आदर्श गुरु आणि शिष्य बनतात.

जो जो जयाचा घेतला गुण। तो म्यां गुरु केला जाण। गुरुसी पडले अपारपणजगसंपूर्ण गुरु दिसे।।असे सांगून अवधूतांनी २४ गुरु केले.

साक्षात दत्तगुरूंनी सुद्धा चोवीस गुरूंना आदर्श मानून त्यांच्याकडून अनुभवरूपी ज्ञान प्राप्त करून घेतले होते. मग आपल्यासारख्या सामान्य मनुष्यांना तरी गुरुची आवश्यकता असणारच!चला मग आपणही या मंगलमय गुरुपौर्णिमा दिनी गुरूंचे पूजन करून आशीर्वाद घेऊन पावन होऊया.

**गुरुपौर्णिमेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!**



**- सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.**

## गुरुपौर्णिमा



हिंदू धर्मात गुरुचे खूप महत्त्व आहे. गुरु म्हणजे तेजस्वी चंद्रासारखे, जो अंधारात प्रकाश देऊन आपल्याला मार्गदर्शन करतो. गुरु पौर्णिमा सण आषाढ महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जातो.

गुरुंना आपल्या जीवनात विशेष महत्त्व आहे आणि समाजातही गुरुंना सर्वोच्च स्थान आहे. भारतीय संस्कृतीत गुरुंना देवापेक्षाही जास्त मानले जाते. धार्मिक शास्त्रांनुसार, संस्कृतमध्ये 'गु' म्हणजे अंधार/अज्ञान आणि 'रु' म्हणजे प्रकाश/ज्ञान. गुरु आपल्याला अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे घेऊन जातात. म्हणून गुरुला महत्त्व देण्यासाठी महान गुरु वेद व्यासजींच्या जयंतीला गुरु पौर्णिमेचा उत्सव साजरा केला जातो.

महत्त्व: या दिवशी भगवान शिव यांनी आपल्या शिष्यांना ज्ञान दिले. या दिवशी अनेक महान गुरुंचा जन्म झाला आणि अनेकांना ज्ञान प्राप्त झाले. या दिवशी गौतम बुद्धांनी धर्मचक्र प्रवर्तन सुरू केले. गुरुपौर्णिमा हा सण केवळ हिंदूच नव्हे तर जैन, बौद्ध आणि शीख धर्मातील लोक देखील साजरा करतात. गुरुचे महत्त्व लक्षात घेता, प्राचीन शास्त्रांमध्ये गुरुला ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या बरोबरीचे वर्णन केले आहे. आई आणि वडील त्यांच्या मुलांना संस्कार देतात, परंतु गुरु सर्वांना आपली मुले मानतात आणि ज्ञान देतात.

मनुस्मृतीनुसार, उपनयन संस्कारानंतर, विद्यार्थी पुनर्जन्म घेतो. म्हणूनच त्याला द्विज म्हणतात. शिक्षण पूर्ण होईपर्यंत, गायत्री त्याची आई आणि आचार्य त्याचे वडील आहेत. पूर्ण शिक्षणानंतर, तो गुरुपद प्राप्त करतो.

कथा- गुरुपौर्णिमेशी संबंधित पौराणिक कथेनुसार, महर्षी वेद व्यास हे भगवान विष्णूचे अवतार कलावतार आहेत. त्यांच्या वडिलांचे नाव ऋषी पराशर आणि आईचे नाव सत्यवती होते. त्यांना लहानपणापासूनच अध्यात्मात खूप रस होता.

म्हणून त्यांनी त्यांच्या पालकांना परमेश्वराच्या दर्शनाची इच्छा व्यक्त केली आणि वनात जाऊन तपश्चर्या करण्याची परवानगी मागितली, परंतु आई सत्यवतीने वेद व्यासांची इच्छा नाकारली. मग वेद व्यासांच्या आग्रहावरून आईने वनात जाण्याची परवानगी दिली आणि सांगितले की जेव्हा जेव्हा त्याला त्याच्या घराची आठवण येईल तेव्हा त्याने परत यावे. त्यानंतर वेद व्यास तपश्चर्येसाठी वनात गेले आणि वनात जाऊन कठोर तपश्चर्या केली.

या तपश्चर्येच्या पुण्यमुळे वेद व्यास संस्कृत भाषेत पारंगत झाले. त्यानंतर त्यांनी चार वेदांचा विस्तार केला आणि ब्रह्मसूत्रांसह महाभारत, अठरा महापुराणांची रचना केली. आपण वेद व्यासांना कृष्ण द्वैपायन या नावाने देखील ओळखतो. म्हणूनच हिंदू धर्मात वेद व्यासांची पूजा देव म्हणून केली जाते. वेद व्यासांचा जन्म या दिवशी झाला असल्याने, त्याला व्यास पौर्णिमा असेही म्हणतात. महर्षी वेद व्यासांना अमरत्वाचे वरदान आहे. म्हणूनच आजही महर्षी वेद व्यास आपल्यामध्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपात उपस्थित आहेत.

इतिहासाच्या दृष्टीने: प्राचीन काळापासून भारतात गुरु आणि शिष्याची परंपरा आहे. भगवान शिवानंतर गुरुदेव दत्त म्हणजेच दत्तात्रेय हे सर्वात मोठे गुरु मानले गेले आहेत. यानंतर देवांचे पहिले गुरु अंगिरा ऋषी होते. त्यानंतर अंगिरा यांचे पुत्र बृहस्पति गुरु झाले. त्यानंतर बृहस्पति पुत्र भारद्वाज गुरु झाले. याशिवाय प्रत्येक देवता कोणाचा ना कोणाचा तरी गुरु राहिली आहे. सर्व राक्षसांच्या गुरुचे नाव शुक्राचार्य आहे. शुक्राचार्य यांच्या आधी महर्षी भृगु हे राक्षसांचे गुरु होते. असे अनेक महान राक्षस झाले आहेत जे कोणाचे ना कोणाचे तरी गुरु राहिले आहेत.

महाभारत काळात गुरु द्रोणाचार्य हे एकलव्य, कौरव आणि पांडवांचे गुरु होते. परशुराम जी कर्णाचे गुरु होते. त्याचप्रमाणे प्रत्येक योद्ध्याचे कोणी ना कोणी गुरु होते. वेद व्यास, गर्ग मुनी, सांदीपनी, दुर्वासा इत्यादी. चाणक्याचे गुरु त्यांचे वडील चाणक होते. महान सम्राट चंद्रगुप्ताचे गुरु आचार्य चाणक्य होते. चाणक्याच्या काळात अनेक महान गुरु झाले आहेत.

असे म्हटले जाते की महावतार बाबांनी आदि शंकराचार्य यांना क्रियायोग शिकवला आणि नंतर त्यांनी संत कबीर यांनाही दीक्षा दिली. यानंतर प्रसिद्ध संत लाहिरी महाशय हे त्यांचे शिष्य असल्याचे म्हटले जाते. नवनाथांचे महान गुरु गोरखनाथ यांचे गुरु मत्स्येंद्रनाथ (मच्छंदरनाथ) होते, जे ८४ सिद्धांचे गुरु मानले जातात.

निष्कर्ष: गुरुअभावी आपले जीवन शून्य आहे. गुरुंना त्यांच्या शिष्यांबद्दल कोणताही स्वार्थ नसतो, त्यांचे ध्येय सर्वांचे कल्याण असते. ज्या दिवशी त्यांचा शिष्य उच्च पदावर पोहोचतो त्या दिवशी गुरुंना त्यांच्या कार्याचा अभिमान असतो. एखादी व्यक्ती त्यांच्या गुरुंचे ऋण फेडू शकत नाही. गुरु आणि शिक्षकांचा आदर करणे आपले कर्तव्य आहे. विद्यार्थ्याच्या जीवनात गुरु महत्त्वाची भूमिका बजावतात. गुरुंच्या ज्ञान आणि संस्कारांच्या आधारेच त्यांचा शिष्य ज्ञानी बनतो. गुरु एका अज्ञानी शिष्यालाही सक्षम व्यक्ती बनवतात. संस्कार आणि शिक्षण हे जीवनाचे मूळ स्वरूप आहे. यापासून वंचित असलेला व्यक्ती मूर्ख आहे. गुरुंच्या ज्ञानाचे कोणतेही मूल्य नाही.

या दिवशी आपण आपल्या गुरुंची आणि शिक्षकांची पूजा करतो आणि त्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करतो. या दिवशी, शिक्षक आणि गुरुंचा सन्मान करण्यासाठी पाठशाळा, शाळा, महाविद्यालये, आश्रम आणि गुरुकुलांमध्ये कार्यक्रम आयोजित केले जातात. आणि गुरुंच्या सन्मानार्थ गाणी, भाषणे, कविता, नृत्य आणि नाटके सादर केली जातात. अशाप्रकारे, गुरुपौर्णिमेच्या दिवशी, विद्यार्थी त्यांच्या गुरुंच्या सन्मानार्थ अनेक उपक्रम आयोजित करतात.

# आधुनिक शिक्षणाच्या दिशेने आणखी एक पाऊल; AI साथी प्रशिक्षण पूर्ण करणारे दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालय

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण विभाग आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (SCERT) च्या वतीने राज्यातील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेला 'एआय साथी फॉर एज्युकेटर्स' (शिक्षकांसाठी AI साथी) हा ऑनलाईन कोर्स विकसित केला असनू तो DIKSHA Portal वर उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर ऑनलाईन कोर्स चे उद्घाटन मा. शालेय शिक्षण मंत्री, श्री. दादाजी भुसे यांच्या शुभ हस्ते दिनांक १४ जुलै २०२६ मंत्रालय मुंबई येथे संपन्न झाले.

इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना सदर कोर्स पूर्ण करणे आवश्यक आहे. हे प्रशिक्षण ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे अशा सक्त सूचना राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (SCERT) चे संचालक डॉ हेमंत वसेकर यांनी दिल्या होत्या.

याची नोंद घेऊन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ दिलीप नागरगोजे यांनी केले.

त्यांनी सर्व शिक्षकांची बैठक घेऊन या बैठकीत स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून दीक्षा प डाऊनलोड करणे व त्यावरील कोर्स कसा पूर्ण करावा याचे मार्गदर्शन केले.व हे ऑनलाईन प्रशिक्षण अभ्यासक्रम लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी मुदतीत यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. हा कोर्स पूर्ण करणारे महाराष्ट्रातील एकमेव महाविद्यालय आहे.



डिजिटल युगात अध्यापन पद्धती अधिक प्रभावी करण्यासाठी, दैनंदिन कामकाज सुलभ करण्यासाठी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा शिक्षण क्षेत्रात सुरक्षित, नैतिक व जबाबदार वापर वाढवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. केंद्र सरकारच्या 'ह्युमेन एआय लिटरसी मिशन' आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत या प्रशिक्षणाची रचना करण्यात आली होती. शिक्षकांना 'दीक्षा' पोर्टलद्वारे स्मार्टफोन किंवा लॅपटॉपच्या माध्यमातून स्वतःच्या गतीने हा कोर्स पूर्ण करण्याची सुविधा देण्यात आली होती. या अभ्यासक्रमात प्राध्यापकांना कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंगच्या मूलभूत संकल्पना, अध्यापन अधिक परिणामकारक करण्यासाठी एआय साधनांचा वापर, अध्ययन साहित्य निर्मिती आणि विद्यार्थ्यांचे अचूक मूल्यमापन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जेमिनी, चॅटजीपीटी यांसारख्या आधुनिक साधनांचा वापर करून वैयक्तिकृत धडे तयार करणे, इन्फोग्राफिक्स आणि इंटरॅक्टिव्ह पॉडकास्ट तयार करण्याच्या पद्धती शिकवण्यात आल्या. यासोबतच अल्गोरिदममधील पक्षपात टाळणे, डेटा गोपनीयता, सुरक्षितता आणि संस्थात्मक प्रशासकीय कामकाजात एआयचा नैतिक वापर कसा करावा, याविषयीही विशेष मार्गदर्शन करण्यात आले. हा कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या सर्व प्राध्यापकांना डिजिटल प्रमाणपत्रासह ४ तासांचे सीपीडी (CPD) श्रेय मंजूर करण्यात आले आहे.

याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन अध्यापन अधिक सुलभ, रंजक व प्रभावी करण्यासाठी हा कोर्स अत्यंत भविष्यकालीन ठरणार आहे. डायटचे ज्येष्ठ अधिव्याख्याता विजयकुमार सायगुंडे यांनी या कोर्सच्या माध्यमातून सर्व प्राध्यापकांना आपले अध्ययन अधिक सुलभ व नियोजनबद्ध करता येऊ शकते.दैनंदिन कामातील नियमित स्पष्टीकरणे व आशय निर्मिती एआय साधनांद्वारे स्वयंचलित झाल्यामुळे प्राध्यापकांचा बहुमूल्य वेळ वाचेल, ज्याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना अधिक दर्जात्मक व वैयक्तिक मार्गदर्शन करण्यासाठी होईल.

उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी आपले विचार मांडताना नमूद केले की, बदलत्या डिजिटल युगात शिक्षकांनी अद्ययावत तंत्रज्ञानाशी सुसंगत राहणे ही काळाची गरज आहे. एआयचा जबाबदारीने आणि नैतिक चौकटीत राहून वापर कसा करावा, याचे उत्तम भान या अभ्यासक्रमामुळे प्राध्यापकांना मिळाले आहे. आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी वेळेत हे प्रशिक्षण पूर्ण करून तंत्रस्नेही शिक्षणात पुन्हा एकदा अग्रस्थान सिद्ध केले आहे.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्राध्यापकांना प्रमाणपत्राचे वितरण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, ज्येष्ठ अधिव्याख्याता विजयकुमार सायगुंडे श्री. गिरीश माने, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या शुभहस्ते करण्यात आले. हा कोर्स यशस्वी करण्यासाठी प्रा. महेश जंगापल्ले यांचे मोलाचे सहकार्य लाभले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी हा कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल शैक्षणिक वर्तुळातून आणि संस्था प्रशासनाकडून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

## ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पाच्या ५५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत घेतले २०० पेक्षा अधिक गुण

**लातूर/प्रतिनिधी:** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल नुकताच जाहीर झाला .यात ज्ञानप्रकाशच्या तब्बल ५५ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.

इयत्ता ४ वी तून २७ विद्यार्थी तर ७ वीतून २८ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा जास्त गुण घेतले आहेत.

वर्षभर नियमित अभ्यास, वाढीव तास, सराव परीक्षा, गटकार्य, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांचे परिश्रम यामुळेच दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ज्ञानप्रकाशचा निकाल लक्षवेधी लागला आहे.

इयत्ता ४ थी तून अद्वय हौसे- २६६,जयराज भिकाणे - २५८,रमण कातळे - २५४,अक्षत कोडे - २५२,मुग्धा दुवे - २५०,विराट खंदाडे -२५०,गणेश गोपले - २४०,श्रीराज साळुंके - २३६ ,दुर्वा गोडभरले - २३४,सुखदा जोशी- २२८,हर्षाली डांगे - २२४,सारंग कुलकर्णी -२२० ,पृथ्वी स्वामी -२१४, युवराज जाधव - २१०,अलीयान पठाण - २०८,अर्जुन सूर्यवंशी- २०८,शुभ्रा जाधव - २०६,आदिती मोरे -२०४,समर्थ क्षिरसागर -२०४,संचित तांदळे -२०४ ,ईश्वरी वांगे -२०२,प्रणव तत्तापुरे - २०२,रचना कासराळे - २०२,शौर्य पिसाळ - २०२,अवनी गिरी -२००,जयदीप माने -२००,स्वरांजली कोरे -२०० तर इयत्ता ७ वी तून विश्वजीत कैले - २८४,चैतन्य जवादे - २७६, विनया गोमसाळे - २७४,आरुष शेळके - २६८,समृद्धी येरटे २५४, प्रतिक स्वामी - २५२,चैतन्य खंदाडे - २४८,असिम मुलानी-२४४,स्वरा साळुंके-२४२,अथर्व सोमवंशी-२३६,कर्मण्य खिचडे-२३०,अवनीश कुकाले - २२८,समर्थ लाखुटे - २२८,प्रणिती पाटील - २२८,आर्यन फुलसे - २२६,वत्सल काटेकर - २२६,आरोही खरटमोल - २१८,हर्षित नलवाड - २१८,तुलसी सूर्यवंशी - २१६,प्रणव आयनाले - २१६,आरवी देवकते - २१४,सर्वज्ञ नागुरे - २१४,अनयराज स्वामी - २१२,गौरांग गायकवाड - २१०, संस्कृती राठोड - २०६,आरुषी यादव - २०२ ,प्रणव जाधवर - २०२ , विराज पवार - २०० २०२५-२६ यावर्षी एकूण चार वर्गांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा झाली, यात इ ५ वी आणि ८ वी तून एकूण २३३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ३३ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत . आणि तर इ ४ थी आणि ७वी तून एकूण २३८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती .त्यापैकी ५७ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. या विद्यार्थ्यांना शिवशंकर राऊत , शीतल येरटे, संजय सूर्यवंशी, तृप्ती जेऊरकर, अर्चना दबडगावकर, पूजा मठपती, शिवकन्या लुल्ले यांनी मार्गदर्शन केले.

प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे , संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे, उपमुख्याध्यापक शिवशंकर राऊत, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, विभाग प्रमुख माधवी मिरजकर यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे आणि पालकांचे अभिनंदन केले.

## माजी विद्यार्थ्यांनी प्रकल्पाशी ऋणानुबंध कायम जपावेत: प्रमोदजी कुलकर्णी

**लातूर/प्रतिनिधी:** जनकल्याण निवासी विद्यालयाने विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच दिले नाही, तर जीवनमूल्ये, संस्कार आणि समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव दिली आहे. त्यामुळे प्रत्येक माजी विद्यार्थ्याने प्रकल्पाशी आपले ऋणानुबंध कायम जपून संस्थेच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन जनकल्याण निवासी विद्यालयाचे माजी प्रकल्पप्रमुख श्री प्रमोदजी कुलकर्णी यांनी केले.




जनकल्याण निवासी विद्यालय, हरंगुळ (बु.) येथे सन १९९३ ते २००० या कालावधीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकल्पाध्यक्ष श्री प्रकाशजी लातूरे होते. यावेळी उपाध्यक्ष डॉ. लीलाताई कर्वा, कार्यवाह श्री राजेशजी सुगरे, सहकार्यवाह श्री उमेशजी सेलुकर, वसतीगृह समिती अध्यक्ष श्री प्रशांतजी मेतकुटे, मुख्याध्यापक श्री ज्ञानेश्वर सोनटक्के, अधीक्षक श्री दत्ता माने, सहअधीक्षक श्री बाबासाहेब मते, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री सोमनाथ मेदगे व सचिव श्री वसुदेव ओझा यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्नेहमेळाव्यास १९९३ ते २००० या कालावधीत प्रकल्पात कार्यरत असलेले श्री अजय रेणापुरे, श्रीनिवास ढोके, श्री संजय जोशी आणि श्री विजय कुलकर्णी हेही उपस्थित होते. अनेक वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

प्रास्ताविकात प्रकल्पाध्यक्ष श्री प्रकाशजी लातूरे यांनी विद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घेत माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या प्रगतीत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयाताई कुलकर्णी व सचिन पाटील यांनी केले, तर व्यासपीठाचा परिचय बाहुबली भस्मे यांनी करून दिला.

स्नेहमेळावा यशस्वी करण्यासाठी बाहुबली भस्मे, विजयाताई कुलकर्णी, सचिन पाटील, मनोजकुमार कुंभार आणि श्याम नामवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राज्यस्तरीय शेतीमित्र पुरस्कारप्राप्त विठ्ठल कटके यांचे आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिनंदन



**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय 'वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार' रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांना मिळाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी अभिनंदन केले.

मुंबई येथे कृषी दिनी आयोजित एका कार्यक्रमात राज्याचे महामहीम मा. राज्यपाल जिष्णूदेव वर्मा आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व इतर अनेक मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेतीविषयक समस्या, शेतकऱ्यांच्या अडचणी, कृषी विभागाच्या विविध योजना तसेच शेतीतील सकारात्मक प्रयोग यांना प्रसिद्धी देत विठ्ठल कटके यांनी कृषी क्षेत्राशी संबंधित विषय सातत्याने मांडले. त्यांच्या या कार्याची शासनस्तरावर दखल घेत राज्यस्तरीय वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्काराने गौरव करण्यात आला.

सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील रेणापूर येथील ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके यांचा यथोचित सत्कार करून भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी अभिनंदन केले. यावेळी रेणापूर तालुक्यातील विविध वृत्तपत्राचे पत्रकार रफीक शिकलकर, सिद्धार्थ चव्हाण, चंद्रकांत कातळे, सुधाकर दहिफळे, बालाजी कटके, आर. डी. अपसिंगेकर, निजाम शेख, नामदेव शिंदे, ईश्वर बद्दर, भरत भोसले, कोंडीराम काळे यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

## मनोरुग्णाने स्टेअरिंग ओढले, एसटीची स्कूलबसला धडक

**लातूर/प्रतिनिधी:** म लातूर-औसा महामार्गावर चांडेश्वर परिसरातील किड्स इन्फो पार्क शाळेजवळ एका मनोरुग्ण प्रवाशाने चालू एसटी बसचे स्टेअरिंग अचानक ओढल्याने भीषण अपघात झाला. बसचालक माधव देमगुंडे यांनी प्रसंगावधान राखल्यामुळे मोठी जीवितहानी टळली; मात्र या घटनेत चालकासह पाच जण जखमी झाले आहेत. निलंगा आगाराची बस (पंढरपूर-लातूर-निलंगा) दुपारी १:४५ वाजेच्या सुमारास चांडेश्वर गावानजीक आली. त्यावेळी ५० ते ६० किमी वेगात असलेल्या बसमधील एका प्रवाशाने अचानक चालकाच्या केबिनमध्ये घुसून स्टेअरिंग जोराने वळवले. चालकाने या कृत्याला कडाडून विरोध केला, मात्र तोपर्यंत बस रस्त्याखाली उतरली आणि तिथे उभ्या असलेल्या तीन स्कूलबसपैकी एकावर जाऊन आदळली. या जोराच्या धडकेमुळे एक स्कूलबस पलटी झाली, तर एसटी शेतात जाऊन थांबली. सुदैवाने एसटी उलटली नाही. अपघाताच्या वेळी एसटीत ३५ प्रवासी होते.

बस ही लातूरहून निलंग्याकडे जात होती. परंतु, अचानक एक व्यक्ती हा थेट बस चालकाजवळ आला आणि त्याने जोराने स्टेअरिंग वळवली. बसचालक देमगुंडे यांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला परंतु, तोपर्यंत बस रस्त्याखाली उतरली आणि उभ्या स्कुल बसला धडक दिली. परंतु, देमगुंडे यांनी प्रसंगावधान राखल्याने बस पलटी झाली नाही त्यामुळे मोठा अनर्थ टळला. राहुल पाटील, वाहक,निलंगा आगार.

हा अपघात दुपारी पावणे दोनच्या सुमारास घडला. शाळेची वेळ असल्याने सर्व विद्यार्थी वर्गात होते आणि सुदैवाने स्कूलबस रिकाम्या उभ्या होत्या. शाळा सुटण्यापूर्वी ४५ मिनिटे अगोदर अपघात झाल्याने मोठा अनर्थ टळला.

# पानचिंचोलीत बालदिंडी सोहळ्यातून मतदान जनजागृती जिल्हा परिषद कन्या शाळेतील विद्यार्थ्यांनी काढली दिंडी

**निलंगा/प्रतिनिधी** : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त संपूर्ण राज्यभर विठ्ठल भक्तीचा उत्सव साजरा होत असताना निलंगा तालुक्यातील मौजे पानचिंचोली येथे भक्ती, संस्कृती, सामाजिक बांधिलकी आणि लोकशाही मूल्यांचा प्रेरणादायी संगम अनुभवायला मिळाला. वारकरी परंपरेच्या दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून ग्रामस्थ, वारकरी, विद्यार्थी आणि नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देत व्यापक मतदान जनजागृती करण्यात आली. आपले मत-आपला अधिकार, लोकशाहीचा भक्कम आधार, चला, मतदान करूया... सुजाण नागरिक बनूया! अशा प्रभावी घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

जिल्हा परिषद कन्या शाळा, पानचिंचोली यांच्या वतीने 'भव्य बालदिंडी सोहळा २०२६-२७' उत्साहात आयोजित करण्यात आला. या बालदिंडीत विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. पारंपरिक वारकरी वेशभूषा, टाळ-मृदंगाचा गजर, भगवे पताकाधारी वारकरी, विठ्ठल-रखुमाईच्या जयघोषाने संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक मानली जाते. या भक्तिमय वातावरणाचा उपयोग करून प्रशासनाच्या वतीने लोकशाही सुदृढ करण्यासाठी मतदान जनजागृतीचा उपक्रम राबविण्यात आला. दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांनी आणि ग्रामस्थांनी हातात जनजागृतीचे फलक घेत मतदानाचा संदेश गावोगावी पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला. जय हरी विठ्ठल... जय जय राम कृष्ण हरी... या अखंड जयघोषात भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या दिंडीने वारकरी परंपरेचा संदेश देतानाच लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचे महत्त्वही प्रभावीपणे अधोरेखित केले. भक्ती आणि लोकशाहीचा असा अनोखा मिलाफ घडविणारा हा उपक्रम परिसरात विशेष चर्चेचा विषय ठरला. बालदिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाची परंपरा, भारतीय संस्कृती, सामाजिक ऐक्य, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्यात आली. ज्ञान, भक्ती आणि संस्कार यांचा संगम घडवत विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीची ओळख करून देण्याबरोबरच जागरूक नागरिकत्वाचे धडेही देण्यात आले. या कार्यक्रमाला सरपंच गीतांजली , हनमंते, उपसरपंच बब्रुवान, जाधव, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रामभाऊ पाटील, ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत साळुंके, तलाठी अमर सुरवसे, तसेच ग्रामस्थ, वारकरी,प्रतिष्ठित नागरिक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वयोवृद्ध दाम्पत्याला लक्ष करून त्यांना लुटणारे आरोपी २४ तासात जेरबंद...

**दोन आरोपी मुद्देमालासह ताब्यात, स्थानिक गुन्हे शाखा, धाराशिव यांची उल्लेखनीय कारवाई**



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- वयोवृद्ध दाम्पत्याला लक्ष्य करून जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही तासात जेरबंद करण्यात यश मिळविले आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ३६,००० किमतीचे मनी मंगळसूत्र व जझझज कंपनीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे. चौकशीदरम्यान आरोपींनी आणखी एका चोरीच्या गुन्हयाची कबुली दिल्याने एकूण दोन गुन्हयांची उकल झाली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनी कासार व पथक यांनी त्यांना मिळालेल्या खात्रीशीर गुप्त माहितीच्या आधारे व तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने पोलीस स्टेशन शिराढोण गु.र.नं. १६२/२०२६ । मधील आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपींनी सदर गुन्हयासह पोलीस स्टेशन भूम गु.र.नं. ४२३/२०२६ या मोटार सायकल चोरीच्या गुन्हयाचीही कबुली दिली.

या कारवाईत शिवराम उर्फ बेवड्या धनाजी पवार (वय २१) रा लक्ष्मी पारधी पेढी, तेरखेडा व आकाश उर्फ बबलू दादाराव पवार (वय १९) रा. मोहा पारधी पेढी यांना अटक करण्यात आली असून त्यांच्या आणखी एका साथीदाराचा सहभाग निष्पन्न झाला आहे. आरोपींकडून मनी मंगळसूत्र व जझझज कंपनीचा मोबाईल असा ३६,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींची वैद्यकीय तपासणी करून पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्यांना पोलीस स्टेशन शिराढोण यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही उल्लेखनीय कारवाई श्रीमती रितू खोखर, पोलीस अधीक्षक, धाराशिव व श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, धाराशिव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे, पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार, सपोनि. सुदर्शन कासार, पोह. शौकत पठाण, पोह. प्रकाश औताडे, पोह. जावेद काझी, पोह. फरहान पठाण, चापोह. नागनाथ गुरव, चापोह. रत्नदीप डोंगरे तसेच टढढ पथक, धाराशिव यांनी संयुक्तरीत्या पार पाडली.

# धाराशिवमधील प्रत्येक शेतावरील पीक-पाणी परिस्थिती आता मोबाईलवर ; आय आय टी मुंबईच्या 'वॉटर बजेट'चा अभिनव उपक्रम

धाराशिव, (जिमाका)- कृषी विभाग,धाराशिव, जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव आणि आय आय टी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने Geo-spatial agriculture Planning Platform for Climate Resilient Dharashiv हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून,त्याअंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक शेतजमिनीवरील पीक व पाणी परिस्थितीची अद्ययावत माहिती आता थेट मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या प्रकल्पाची एक महत्त्वाची उपलब्धी म्हणजे शेतकऱ्यांना डचड द्वारे त्यांच्या मोबाईलवर पीक व पेरणीविषयक सल्ला पाठविण्यात येत आहे.संबंधित संदेशाचा मजकूर पुढीलप्रमाणे आहे :

प्रिय शेतकरी,ऋखड तंत्राद्वारे पीक-पाणी नियोजनासाठी तुमच्या शेताची गटनिहाय माहिती पुढील लिंकवर पहाः http://1mt.in/DHRSV/qTc/enDlH - जिल्हा प्रशासन, धाराशिव.

जिल्ह्यातील Farmer ID असलेल्या आणि agriStack मधील गटाची माहिती गावाच्या गट नकाशांशी जुळलेल्या सुमारे दोन लाख शेतकऱ्यांना हा संदेश २४ किंवा २५ जुलै २०२६ रोजी त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर जिल्हा प्रशासनाकडून पाठविण्यात आला आहे.हा संदेश कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्षित करू नये,असे आवाहन करण्यात आले आहे.

संदेशातील लिंकच्या माध्यमातून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या वैयक्तिक शेतजमिनीनुसार दररोज मातीतील ओलावा,पिकाची सद्यस्थिती,पुढील सात दिवसांचा हवामान अंदाज तसेच त्या आधारे पेरणी, सिंचन आणि कीड-रोग व्यवस्थापनाविषयीचा सल्ला उपलब्ध होणार आहे.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, डचड दररोज पाठविण्यात येणार नाही.मात्र,संदेशातील लिंक दररोज अद्ययावत केली जाणार असून, संपूर्ण हंगामभर शेतकरी त्याच लिंकवरून आपल्या शेताची ताजी परिस्थिती पाहू शकतील.त्यामुळे शेतकऱ्यांनी हा डचड किंवा त्यातील लिंक जतन करून ठेवावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

आय आय टी मुंबईने विकसित केलेल्या 'वॉटर बजेट' मॉडेल आणि स्कायमेट संस्थेच्या हवामान अंदाजाच्या आधारे तयार होणाऱ्या विश्लेषणावर आधारित हा सल्ला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत असून,हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाणारी अधिक शाश्वत आणि वैज्ञानिक शेती घडविण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

या सल्ला प्रणालीबाबत अधिक माहितीसाठी प्रशासनाने उपलब्ध करून दिलेला YouTube pih{S>Amo https://youtube.com/shorts/883euVZEkiE?si=TghX4BEUIQeSB3Un या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आला असून ते पाहण्याचेही आवाहन

# 'पीककर्ज'ची अट की शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ? विमा भरण्यासाठी नवा अडसर; सरकारने उत्तर द्यावे!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी सुरू करण्यात आलेली पीक विमा योजना आता अनेक शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. यंदा विमा भरण्यासाठी पीककर्ज घेतलेले नसल्याचे 'डिक्लेरेशन' अनिवार्य करण्यात आल्याने हजारो शेतकरी संभ्रमात पडले आहेत. परिणामी, मुदत संपण्यास अवघा आठवडा शिल्लक असतानाही अत्यल्प शेतकऱ्यांनीच विमा भरल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

सरकारची योजना की शेतकऱ्यांची परीक्षा?

एका बाजूला सरकार पीककर्जमाफीची प्रक्रिया सुरू करत आहे, तर दुसऱ्या बाजूला विमा भरण्यासाठी अशा अटी लादल्या जात आहेत की, शेतकरी अर्जच करण्यास घाबरत आहेत. आज डिक्लेरेशन भरले तर उद्या कर्जमाफी मिळणार नाही ना? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे.

योजनेची अंमलबजावणी करताना स्पष्टता नसल्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत झाला असून, प्रशासनाने वेळेत मार्गदर्शन न केल्याने गोंधळ अधिकच वाढला आहे.

प्रशासनही अनभिज्ञ; मग शेतकरी कुणाकडे जाईल?

धक्कादायक बाब म्हणजे, संबंधित अधिकाऱ्यांकडेही या अटींबाबत स्पष्ट माहिती नसल्याचे समोर येत आहे. शेतकरी प्रश्न विचारतो, पण उत्तर मिळत नाही. अशा परिस्थितीत योजना राबविण्याचा नेमका उद्देश काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

**शेतकऱ्यांचा आक्रोश**

शेतकऱ्यांना विमा हवा आहे, संरक्षण हवे आहे; मात्र त्यासाठी नव्या अटींचे जाळे विणले जात असेल तर ही योजना कागदावरच राहील. नैसर्गिक संकटे, वाढते उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चितता यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा आणखी एक मानसिक ताण ठरत आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या योजनांमध्ये संभ्रम नव्हे, तर पारदर्शकता आवश्यक आहे. सरकारने तातडीने पीक विम्याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करून, पीककर्ज आणि विमा प्रक्रियेतील गैरसमज दूर करावेत. अन्यथा शेतकरी केंद्रस्थानी ही घोषणा केवळ घोषणाच राहील.

शेतकरी वाचला तरच शेती वाचेल... आणि शेती वाचली तरच देशाची अर्थव्यवस्था मजबूत राहील!


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


# धाराशिव जिल्हा कॉँग्रेसकडून MHT-CET कथित घोटाळा व विस्तार अधिकारी (शिक्षण)पदोन्नतीतील अनियमितते विरोधात निवेदने



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित चक्ढ-उएढ परीक्षा प्रक्रियेत गेल्या तीन वर्षांपासून सुरू असल्याचा आरोप असलेल्या कथित घोटाळा व अनियमिततेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच धाराशिव जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत विस्तार अधिकारी (शिक्षण) पदोन्नती प्रक्रियेत झालेल्या गंभीर अनियमिततेची राज्यस्तरीय चौकशी करून सदर पदोन्नती प्रक्रिया रद्द करण्यात यावी, या मागण्यांसाठी (दि. २८ ) धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी जिल्हाधिकारी धाराशिव तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत संबंधित मंत्र्यांना निवेदने सादर करण्यात आली.

MHT-CET संदर्भातील निवेदनात परीक्षेतील कथित गैरप्रकारांमुळे लाखो विद्यार्थी व पालकांमध्ये तीव्र संभ्रम व असंतोष निर्माण झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करावे तसेच भविष्यात परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली.

तर दुसऱ्या निवेदनात धाराशिव जिल्हा परिषद शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी (शिक्षण) पदोन्नती प्रक्रियेत शासनाचे नियम, निर्देश तसेच न्यायालयीन आदेशांकडे दुर्लक्ष करून पदोन्नती देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेची राज्यस्तरीय उच्चस्तरीय चौकशी करून दिनांक ३ जुलै २०२६ रोजी राबविण्यात आलेली पदोन्नती प्रक्रिया तात्काळ रद्द करावी, नव्याने पारदर्शक पद्धतीने पदोन्नती प्रक्रिया राबवावी तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची व कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यासोबतच, शासनाने तातडीने योग्य निर्णय न घेतल्यास धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने पुढील काळात तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

ही निवेदने जिल्हाधिकारी धाराशिव तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे आणि पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना पाठविण्यात आली आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांच्यासह राजाभाऊ शेरखाने, प्रशांत पाटील, खलील सय्यद, विनोद वीर, अग्निवेश शिंदे, सरफराज काजी, संजय गजधने, बाबा मोमीन आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कळंब नगरपालिकेतील भाजप विरोधकांच्या मोटबांधणीचा प्रयत्न

कळंब नगरपालिकेतील ठाकरे सेनेच्या नगरसेवकांनी आमदार प्रा. तानाजी सावंत यांची भेट घेतल्याने कळंबच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. या भेटीनंतर संबंधित नगरसेवकांच्या संभाव्य ऑपरेशन टायगरबाबत चर्चा सुरू झाली आहे.

कळंब नगरपालिकेच्या निवडणुकीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे यांच्या पत्नी सुनंदा कापसे आणि ठाकरे सेनेचे माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा यांच्या पत्नी रश्मी मुंदडा यांच्यात नगराध्यक्षपदासाठी थेट लढत झाली. या निवडणुकीत शिवसेनेने नगराध्यक्षपदावर विजय मिळवत सत्ता काबीज केली.

सध्या नगरपालिकेत शिवसेनेचे नगराध्यक्षांसह चार नगरसेवक, भाजपचे सहा, उबाठा गटाचे नऊ आणि काँग्रेसचा एक असे पक्षीय संख्याबळ आहे. संख्येने सर्वाधिक नऊ नगरसेवक ठाकरे गटाकडे असल्याने माजी नगराध्यक्ष संजय मुंदडा यांची शहराच्या राजकारणातील ताकद दखलपात्र मानली जाते. नगरपालिकेत सध्या शिवसेना आणि भाजपची सत्ता असून, ठाकरे गट व काँग्रेस विरोधी बाकावर आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून सत्ताधारी आघाडीतील घटक पक्षांमध्ये शीतयुद्ध सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. दुसरीकडे विरोधी बाकावर असलेला उबाठा गट विविध विषयांवर आक्रमक भूमिका घेत उघडपणे सत्ताधाऱ्यांवर टीका करत आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांत राजकीय संघर्ष अधिक तीव्र होताना दिसत आहे. दरम्यान, मागील काही दिवसांपासून उबाठा गटातील नगरसेवक हे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आमदार प्रा. तानाजी सावंत यांच्या संपर्कात असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. त्यामुळे आगामी काळात उबाठा गटातील नगरसेवक नेमकी कोणती भूमिका घेतात आणि कळंबच्या राजकारणात कोणती नवी समीकरणे तयार होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

पुण्यात जाऊन भेट घेतल्याने चर्चेला उधाण कळंब नगरपालिकेतील ठाकरे सेनेचे नगरसेवक व नगरसेविकांचे पती यांनी पुणे येथे आमदार प्रा. तानाजी सावंत यांची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. या भेटीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली. विकासकामांबाबत चर्चा झाली की नगरपालिकेच्या सत्तेत सहभागी होण्याबाबत खलबते झाली, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या भेटीमागील नेमका राजकीय हेतू काय, याबाबत विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत विनोद बाबु राठोड, वय ३८ वर्षे, रा.तलमोड ता. उमरगा जि. धाराशिव याचे कबज्यातुन दि २७.०७.२०२६ रोजी १४.४० वा. सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ३,००० किंमतीची २८ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत भिमराव लक्ष्मण जाधव, वय ४८ वर्षे, रा. वांगी खु ता.परंडा जि. धाराशिव, साहेल फरीद शेख, वय २४ वर्षे, रा. समता नगर परंडा ता. परंडा जि. धाराशिव,रामदास कालीदास मोरे,वय ४४ वर्षे, रा. शिराळा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.२७.०७.२०२६ रोजी १२.१० ते १२.४० वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे चार चाकी गाडी क्र एमएच १४ केबी १६२४, रिक्षा क्र एमएच २५ एके २६२९, चारचाकी गाडी क्र एमएच २५ एजे २९६७ ही वाहने बार्शी रोड परंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व कुर्डवाडी रोड परंडा येथे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ अन्वये परंडा पो.ठा. येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदवले आहेत.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649